दैनिक
www.epaper.rajyaloktantra.com
# राज्य लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार.....
● छत्रपती संभाजीनगर ● पुणे ● अहिल्यानगर ● जालना ● धाराशिव जिल्ह्यात वितरीत होणारे दैनिक

बीड – महाराष्ट्र | वर्ष–६ | अंक–१२ | मंगळवार दि.३१ मार्च २०२६ | RNI No.: MAHMAR/2021/85884 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | पाने–६ | किंमत ३ रूपये

## संपादकीय

### 'एलपीजी तुटवड्याची भीती की सरकारी विरोधाभास?

आखाती देशांतील युद्धजन्य परिस्थितीचा परिणाम आता भारतातील ऊर्जा सुरक्षेवर स्पष्टपणे दिसू लागला आहे. विशेषत: एलपीजी गॅसच्या संभाव्य तुटवड्याबाबत राज्याचे अन्न व नागरी पुरवठा मंत्री छगन भुजबळ यांनी केलेल्या विधानामुळे सर्वसामान्य नागरिकांच्या चिंतेत भर पडली आहे. ''तीन महिन्यांनंतर एलपीजीचा पुरवठा बंद होऊ शकतो'' या त्यांच्या वक्तव्याने परिस्थितीचे गांभीर्य अधोरेखित केले.

# अवकाळीसह गारपिटीचा तडाखा सुरुच

## पुण्यासह उत्तर महाराष्ट्राला झोडपले, कांदा, गहू पिकाचे नुकसान, शेतकरी चिंतेत

पुणे । प्रतिनिधी

**राज्यातील अनेक भागात अवकाळी पावसाचे धुमशान सुरुच आहे. पुण्यातील पश्चिम भागात सोमवारी वादळी वाऱ्यासह गारांचा पाऊस झाला. तसेच उत्तर महाराष्ट्रातील धुळे, नाशिक जिल्ह्याला पावसाने झोडपले. यामुळे कांदा, गहू, हरभरा, मका पिकांचे नुकसान होण्याची शक्यता आहे.**

पुण्यातील बाणेर, औंध, बालेवाडी, म्हाळुंगे, विमान नगर, हडपसर या भागात पाऊस पडल्याने रस्त्यावर पाणी साचले. पुण्यातील बाणेर परिसरात अर्धा तास पाऊस झाला. यामुळे पासपोर्ट कार्यालयाच्या समोर गुडघाभर पाणी साचले. पुण्यात अनेक



ठिकाणी रस्ते पाण्याखाली गेल्याने वाहतूक कोंडी दिसून आली. पुणे जिल्ह्याच्या अनेक भागांमध्ये सर्वत्र मध्यम ते जोरदार पाऊस तसेच काही ठिकाणी गारपीट झाल्याने तापमानात मोठी घट झाली. धुळे जिल्ह्यातील साक्री तालुक्यात अवकाळी पाऊस पडला. तसेच पिंपळनेर परिसरात दुपारच्या सुमारास जोरदार गारपीट झाली. समोडे, घोडदे, कासारे परिसरात अधिक गारपीट झाली. यामुळे कांदा, गहू, हरभऱ्यासह इतर उन्हाळी पिकांचे नुकसान होण्याची शक्यता असल्याने शेतकरी हवालदिल झाला आहे. नाशिक जिल्ह्यात अवकाळी पावसाने थैमान सुरुच आहे. येथील मालेगाव, चांदवड आणि येवला तालुक्यात वादळी वाऱ्यासह गारपीट झाली. यामुळे पिकांचे मोठे नुकसान झाले आहे. चांदवड परिसरात काढणीला आलेला गहू पावसाने आडवा झाला आहे. तसेच फळपिकांचे ▶▶ पान २ वर

> **गारपिटीसह वादळी पावसाची शक्यता**
> मध्य महाराष्ट्रासह मराठवाड्यातील जिल्ह्यांमध्ये मेघगर्जनेसह मंगळवारी वादळी पावसाची शक्यता आहे. दक्षिण कोकण, गोवा, मध्य महाराष्ट्र आणि मराठवाड्याच्या काही तुरळक ठिकाणी विजांच्या कडकडाटासह गारपिटीसह वादळी हलका ते मध्यम पाऊस आणि ताशी ४० ते ५० किलोमीटर वेगाने वारे वाहण्याची शक्यता हवामान विभागाने व्यक्त केली आहे.

# राज्यात केरोसीन वितरणाचा शासन आदेश जारी

## प्रत्येक कुटुंबाला मिळणार ३ लिटर, केंद्राकडून मिळाला ३७.४४ लाख लिटरचा साठा



मुंबई । प्रतिनिधी

एलपीजी गॅसच्या तुटवड्याच्या पार्श्वभूमीवर राज्य सरकारने नागरिकांना दिलासा देणारा महत्वाचा निर्णय घेतला आहे. महाराष्ट्रात तात्पुरत्या स्वरूपात रॉकेल (केरोसीन) वितरण करण्याचा शासन आदेश जारी करण्यात आला आहे. केंद्र सरकारकडून राज्याला एकूण ३७.४४ लाख लिटर रॉकेल मंजूर करण्यात आले असून, त्याचे जिल्हानिहाय वाटप करण्यात येणार आहे.

शासनाच्या आदेशानुसार, प्रति कुटुंब किंवा प्रति शिधापत्रिका ३ लिटर रॉकेल देण्यात येणार आहे. यामुळे गॅस टंचाईच्या काळात नागरिकांना पर्यायी इंधन उपलब्ध होणार आहे. रॉकेल वितरणासाठी शिधापत्रिका धारक, श्वेत शिधापत्रिका धारक (उपलब्धतेनुसार), शिधापत्रिका नसलेले कुटुंब (ग्रामपंचायत दाखल्यावर), स्थलांतरित मजूर (ओळखपत्राच्या आधारे) यांनी पात्र धरण्यात येणार आहे. याची वितरणाची जबाबदारी ही रास्त भाव दुकाने आणि परवानाधारक विक्रेत्यांवर असणार आहे. प्रत्येक लाभार्थ्याला ३ लिटरप्रमाणे रॉकेल देणे बंधनकारक राहील. एखाद्या गावात विक्रेता उपलब्ध नसल्यास शेजारच्या गावातून रॉकेल उपलब्ध करून दिले जाईल. रॉकेल वितरण मार्च २०२६ पासून सुरू होणार असून, वाटपानंतर ४५ दिवसांच्या आत संपूर्ण उचल करणे ▶▶ पान २ वर

> **दराबाबत स्वतंत्र निर्णय**
> रॉकेलच्या दराबाबत अद्याप निर्णय झालेला नसून, यासंदर्भात शासन लवकरच स्वतंत्र आदेश काढणार आहे. गॅस टंचाईच्या काळात सामान्य नागरिकांना दिलासा देण्यासाठी राज्य सरकारचा हा निर्णय महत्वाचा मानला जात आहे.

# तार चोरताना टॉवर कोसळला पुण्यातील दोघांचा बीड जिल्ह्यात मृत्यू



केज । प्रतिनिधी

तालुक्यातील नांदूरघाट शिवारात विद्युत टॉवरची तार चोरी करण्याच्या प्रयत्नात असलेल्या पुण्याच्या दोन संशयित तरुणांचा टॉवर अंगावर कोसळून दुर्दैवी मृत्यू झाला. २९ मार्च रोजी मध्यरात्री ही घटना घडली. अविनाश पटोळे आणि आकाश आडे अशी मृतांची नावे आहेत.

टॉवरवर चढून तार काढत असताना संतुलन बिघडल्याने लोखंडी टॉवर ▶▶ पान २ वर

# सरकारकडून महाराष्ट्रधर्म व संविधानांच्या मुल्यांची पायमल्ली

## कॉंग्रेसची सुरतगाव ते तुळजापूर शेतकरी संघर्ष न्याय यात्रा

तुळजापूर । प्रतिनिधी

शेतकरी अस्मानी सुलतानी संकटाने त्रस्त असून शेतमालाला योग्य भाव मिळत नाही, आत्महत्या वाढल्या आहेत, त्यातच मोदी सरकारने अमेरिकेसमोर सरेंडर होत व्यापार करार केल्याने शेतकरी हवालदिल झाला आहे, या करारामुळे भारतातील शेती व शेतकरी उद्ध्वस्थ होणार आहे. भाजपा सरकार शेतकरी विरोधी असून फडणवीस सरकारने जाहीर केलेली शेतकरी कर्जमाफी म्हणजे 'लबाडाघरचे जेवण, जेवल्याशिवाय खरे नाही', फडणवीस खोटारडे आहेत, जेव्हा कर्जमाफी मिळेल तेव्हाच खरे, असे म्हणत शेतकऱ्यांचा ७/१२ कोरा करा, अशी मागणी कॉंग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी केली.

शेतकऱ्यांच्या विविध मागण्यांसाठी कॉंग्रेस पक्षाने धाराशिवच्या तुळजापूर तालुक्यातील सुरतगाव ते तुळजापूर शेतकरी संघर्ष न्याय यात्रेचे आयोजन केले होते. या यात्रेला मोठा प्रतिसाद मिळाला. यावेळी कॉंग्रेस सेवादलाचे प्रदेशाध्यक्ष विलास औताडे, यात्रेचे समन्वयक प्रदेश कॉंग्रेसचे सरचिटणीस जितेंद्र देहाडे, प्रदेश कॉंग्रेसचे सरचिटणीस आदित्य अशोकराव पाटील, दादासाहेब मुंडे, अमर खानापुरे, धाराशिव जिल्हा कॉंग्रेस कमिटीचे अध्यक्ष धीरज पाटील, जिल्हा कॉंग्रेसचे संघटक राजेंद्र शेरखाने, सचिव पांडुरंग कुंभार, प्रशांत पाटील, अग्नीवेश शिंदे, उमेश राजे निंबाळकर, सेवादलाचे जिल्हाध्यक्ष विलास शाळू बीड जिल्हा कॉंग्रेस कमिटीचे अध्यक्ष राहुल सोनावणे, लातूर शहर जिल्हा कॉंग्रेस कमिटीचे ▶▶ पान २ वर

# ट्रम्प यांच्याकडून इराणचे तेल आणि वीज नेटवर्क उद्ध्वस्त करण्याची धमकी

## होर्मुझ तात्काळ उघडी करण्यासाठी दिला इशारा, युद्ध आणखी वाढण्याची शक्यता

वॉशिंग्टन । वृत्तसंस्था

लवकरच कोणताही करार झाला नाही आणि होर्मुझची सामुद्रधुनी व्यापारासाठी पुन्हा उघडली नाही, तर इराणचे तेल विहिरी, वीज प्रकल्प आणि खार्ग बेट यांसारख्या महत्त्वपूर्ण पायाभूत सुविधा पूर्णपणे उद्ध्वस्त केल्या जातील, अशी धमकी अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी दिली आहे. एकीकडे इराणबरोबर कराराचे संकेत देत असतानाच, ट्रम्प



यांनी अभूतपूर्व लष्करी कारवाईचा इशारा देऊन दबाव वाढवला आहे.

ट्रम्प यांनी सोशल मीडिया प्लॅटफॉर्म ट्रुथवरील पोस्टमध्ये म्हटले आहे की, इराणमधील आमची लष्करी मोहीम संपवण्यासाठी अमेरिका एका नवीन आणि अधिक समंजस राजवटीशी गंभीर चर्चा करत आहे. यात मोठी प्रगती झाली आहे; परंतु कोणत्याही कारणास्तव लवकरच करार झाला नाही आणि जर होर्मुझची सामुद्रधुनी व्यापारासाठी तातडीने खुली ▶▶ पान २ वर

# थोडक्यात...

### नितीश कुमारांचा आमदारकीचा राजीनामा

पाटना: बिहारचे मुख्यमंत्री नितीश कुमार यांनी अखेर विधान परिषद सदस्य (एमएलसी) पदाचा राजीनामा दिला आहे. नुकतेच ते राज्यसभेवर निवडून गेले, ज्यामुळे नियमानुसार त्यांना आमदारकी सोडणे आवश्यक होते. विशेष म्हणजे, राजीनामा देऊनही ते पुढील काही दिवस मुख्यमंत्री पदावर कायम राहणार आहेत. अशा परिस्थितीत, बिहारचा पुढील मुख्यमंत्री कोण होणार? याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. नितीश कुमार पुढील काही दिवसांत मुख्यमंत्री पदाचाही राजीनामा देऊ शकतात, अशी चर्चा राजकीय वर्तुळात सुरु आहे. मात्र नियमांनुसार ते अजून सहा महिने मुख्यमंत्री पदावर राहू शकतात. राज्यसभेवर निवडून आल्यानंतर त्यांना विधान परिषद सदस्यत्वाचा राजीनामा देणे बंधनकारक होते. त्यामुळे त्यांनी आमदारकी सोडली असले तरी मुख्यमंत्रिपद कधी सोडणार याबाबत अजूनही सस्पेन्स कायम आहे.

### कच्च्या तेलाचा पुन्हा भडका

नवी दिल्ली: अमेरिका, इस्रायल आणि इराण युद्धामुळे कच्च्या तेलाचे भाव आता प्रति बॅरल ११५ च्या वर गेले आहेत. चिंतेची गोष्ट ही की, हे वाढलेले भाव खाली येण्याचे नावच घेत नाहीत. काही दिवसांपूर्वी पश्चिम आशियात युद्ध थांबण्याचे संकेत मिळाले होते. तेव्हा भाव १०० च्या खाली आल्यामुळे सर्वांना दिलासा मिळाला होता; पण ही आशा फार काळ टिकली नाही आणि आता पुन्हा दरवाढीचा भडका उडाला आहे. पश्चिम आशियातील संघर्ष आता पाचव्या आठवड्यातही कायम आहे. तो थांबण्याऐवजी अधिक चिघळण्याची चिन्हे दिसत आहेत. या संघर्षात नवीन देश सामील झाले असून लष्करी हालचाली तीव्र झाल्या आहेत. या सर्व चिंतेच्या केंद्रस्थानी होर्मुझची सामुद्रधुनी आहे. हा जगातील सर्वात महत्वाचा तेल वाहतूक मार्ग आहे. जगातील एकूण तेल पुरवठ्यापैकी सुमारे एक पंचमांशपुरवठा या अरुंद मार्गातून होतो. येथे कोणताही अडथळा आल्यास त्याचा जागतिक पुरवठ्यावर तात्काळ परिणाम होतो.

### 'गाव' अभियानाल १ एप्रिलपासून प्रारंभ

मुंबई: महाराष्ट्राच्या ग्रामीण भागाचा चेहरामोहरा बदलण्यासाठी आणि ग्रामीण जनतेला दर्जेदार आरोग्य सुविधा त्यांच्या उंबरठ्यावर उपलब्ध करून देण्यासाठी राज्य सरकारने 'माझं गाव, आरोग्यसंपन्न गाव' हे अत्यंत महत्वाकांक्षी अभियान सुरू करण्याचा निर्णय घेतला आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार यांच्या मार्गदर्शनाखाली आणि सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री प्रकाश आबिटकर आणि राज्यमंत्री मेघना साकोरे बोर्डीकर यांच्या पुढाकाराने राबविण्यात येणाऱ्या या राज्यव्यापी अभियानाला १ एप्रिलपासून प्रारंभ होत आहे. हे अभियान फक्त सरकारी कार्यक्रमापुरते मर्यादित न राहता, लोकसहभागाद्वारे त्यातून एक व्यापक आरोग्य चळवळ उभी राहावी, असा राज्य शासनाचा मानस आहे. या अभियानांतर्गत प्रत्येक गाव आरोग्यसंपन्न केले जाणार आहे. या प्रस्तावित योजनेमुळे गावापासून ते राज्यस्तरावरील आरोग्य सेवांचे आणि यंत्रणांचे सक्षमीकरण होण्यास मदत होणार आहे. तसेच या उपक्रमामुळे तळागाळातील लोकांपर्यंत वैद्यकीय सेवा पोहोचणार आहेत.

## बाजारभाव

कृषि उत्पन्न बाजार समिती, बीड, दि.३० मार्च २०२६

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| | किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|---|
| गहू: २५६.०० क्विंटल | १,१२३ | २,६०१ | २,२४४ |
| ज्वारी/हायब्रिड: १६१.५० क्विंटल | १,७०० | ४,२०० | ३,२१७ |
| मका/लोकल: ३.५० क्विंटल | १,५०० | १,५०० | १,५०० |
| तूर: १.०० क्विंटल | ६,५०० | ७,००० | ६,७५० |
| उडीद: २.५० क्विंटल | ६,३५४ | ६,३५४ | ६,३५४ |
| बाजरी: ५५.०० क्विंटल | २,४०० | २,७५० | २,६३९ |
| मुग: २.०० क्विंटल | ७,८०० | ७,८०० | ७,८०० |
| सोयाबीन: १८.५० क्विंटल | ५,५०० | ५,५०० | ५,५०० |
| हरभरा: २१.०० क्विंटल | ४,९०० | ५,०५० | ४,९९८ |

# देशात खासदार, आमदारांची संख्या वाढणार

## महाराष्ट्राच्या विधानसभेमध्ये २८८ ऐवजी दिसणार ४३७ आमदार




मुंबई–बीड । प्रतिनिधी

**स्वातंत्र्यानंतर झालेल्या देशाच्या आणि राज्याच्या निवडणुकांमध्ये खासदारांची आणि त्या त्या राज्याच्या विधानसभेतील आमदारांची संख्या आजही तीच असल्याने वाढीव लोकसंख्या लक्षात घेता २०२९ च्या लोकसभा आणि राज्यातील विधानसभेच्या निवडणुकांमध्ये खासदार आणि आमदारांची संख्या वाढणार असल्याचे संकेत मिळत आहेत. यासाठी केंद्रीय गृहमंत्री यांनी प्रादेशिक पक्षाच्या प्रमुखांशी चर्चा देखील केली आहे.**

लोकसभेतील सदस्यांची संख्या गेल्या अनेक वर्षांपासून तीच आहे. प्रामुख्याने वाढलेली लोकसंख्या पाहता प्रतिनिधित्व करणे सहज आणि सुलभ व्हावे यासाठी लोकसभेच्या जागा वाढवण्यात येणार आहेत. विशेषत: प्रत्येक राज्याच्या विधानसभेमध्ये देखील नव्या लोकसंख्येच्या आधारावर या जागांत वाढल्या जाणार आहेत, त्यामुळे महाराष्ट्रातील विधानसभेची सदस्य संख्या देखील वाढणार आहे. राज्यात सध्या लोकसभेच्या ४८ जागा आहेत आता त्या ७२ वर जाण्याची शक्यता आहे. महाराष्ट्र




विधानसभेच्या २८८ जागा आहेत आता त्या ४३७ होण्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे. यासाठी देशाचे गृहमंत्री अमित शहा यांनी राज्यातील प्रादेशिक पक्षासोबत नुकतीच एक बैठक घेतली असून, या बैठकीमध्ये या संदर्भात चर्चाही करण्यात आली आहे. विशेषत: नव्या संसद भवनाचे कामही त्याच पद्धतीने करण्यात आले आहे. या संसद भवनातील आसन व्यवस्था पाहिली तर आगामी वाढणाऱ्या लोकसभा सदस्यांची संख्या गृहीत धरूनच केले असल्याचेही दिसत आहे. सध्या लोकसभेमध्ये ५५२ खासदार आहेत. यात राज्याचे नेतृत्व करणारे ५३० सदस्य तर केंद्रशासित प्रदेशांमधून येणारे २० सदस्य आणि ▶▶ पान २ वर

### मराठवाड्याला पन्नासहून अधिक आमदार!

यामध्ये मराठवाड्यातील परिस्थिती पाहिली तर मराठवाड्यामध्ये आठ खासदार आणि ४६ आमदार आहेत आता या जागा वाढल्यास मराठवाड्यामध्ये ४६ ऐवजी किमान ५० ते ५२ सदस्य असू शकतील तर दहा ते ११ खासदारही दिसतील. कारण राज्यातील लोकसभेच्या ४८ जागा पाहता ते आता ७२ वर जाणार आहेत तर विधानसभेमध्ये २८८ सदस्य संख्या वरून ४३७ एवढे आमदार दिसतील आगामी म्हणजेच २०२९ च्या निवडणुकीमध्ये लोकसभेतील खासदार आणि विधानसभेतील आमदारांची संख्या वाढणार आहे.

# स्वत:ला महादेवाचा अवतार सांगत महिलेवर अत्याचार करणाऱ्या भोंदू ऋषिकेश वैद्यचे पाय आणखी खोलात; तपासात धक्कादायक माहिती उघड

पुणे । प्रतिनिधी

स्वत:ला महादेवाचा अवतार सांगत पुण्यातील एका पिडीत महिलेवर अत्याचार केल्याच्या प्रकरणातील आरोपी ऋषिकेश वैद्य याच्याबाबत आणखी एक धक्कादायक माहिती समोर आली आहे. या प्रकरणाच्या पार्श्वभूमीवर वसईत आरोपी, पिडीतेचा पती आणि 'आमची वसई' या संस्थेच्या सदस्यांमध्ये झालेल्या बैठकीदरम्यान वाद होऊन मारहाणीची घटना घडल्याचे समोर आले आहे.



मिळालेल्या माहितीनुसार, दिनांक २९ ऑक्टोबर रोजी वसईतील हयात बंगल्याजवळ ही बैठक झाली होती. आरोपी ऋषिकेश वैद्य हा मागील दोन वर्षांपासून पिडीतेशी फोन व मेसेज द्वारे संपर्क साधत असल्याच्या कारणावरून पिडीतेचा पती संतप्त होता. या मुद्द्यावर चर्चा सुरू असताना वाद विकोपाला गेला आणि पिडीतेच्या पतीने संतापाच्या भरात आरोपीवर धाव घेतली. या वेळी उपस्थित असलेल्या 'आमची वसई' संस्थेचे सदस्य यांनी मध्यस्थी करण्याचा प्रयत्न केला. मात्र, संतप्त पिडीतेच्या पतीने त्यांनाही मारहाण केल्याची माहिती समोर आली आहे. दरम्यान, या घटनेनंतर पिडीतेच्या पतीविरोधात ३० ऑक्टोंबर २०२५ रोजी एन.सी. दाखल झाली होती. या तक्रारीच्या आधारे वसई पोलिसांनी पिडीतेच्या पतीविरोधात भारतीय न्याय संहिता २०२३ अंतर्गत कलम ११५(२), ३५१(२) आणि ३५२ नुसार एन.सी. (नॉन-कॉग्निझेबल) गुन्हा दाखल केला होता. तसेच त्याला समज देण्यात आली होती. दरम्यान, भोंदू बाबाच्या प्रकरणात नवनवीन खुलासे समोर येत असल्याने या प्रकरणाने अधिकच गंभीर वळण घेतले असून, पोलिस तपास सुरू आहे. मिळालेल्या माहितीनुसार, संबंधित प्रकरणाची सुरुवात वसई येथे झाली होती. तेथील गुन्हा पुढील तपासासाठी पुणे पोलिसांकडे वर्ग करण्यात आला होता. त्यानंतर पुणे पोलिसांनी तपास करत पिंपरी भागातून ऋषिकेश वैद्यला ताब्यात घेतले.तो एका गाडीतून प्रवास करत त्यांच्या नातेवाईकांकडे पुण्यामध्ये येण्यासाठी निघाला होता त्याचवेळी पोलिसांना ही माहिती मिळाली आणि पोलिसांनी त्याला ताब्यात घेतलं आहे. पोलिसांच्या म्हणण्यानुसार, पीडितेचा आरोपी बाबाशी पहिला संपर्क २०२३ मध्ये फेसबुकद्वारे झाला.त्याच वर्षी डिसेंबरमध्ये आरोपी त्या महिलेला भेटण्यासाठी पुण्यात गेला होता. त्याने आपण महादेवाचा अवतार असून ती त्याची 'पार्वती' असल्याचा दावा केला होता. पिडीत महिलेच्या आरोपानुसार,आरोपी तिला पुण्यातील मांजरी भागातील एका लॉजमध्ये घेऊन गेला, तिला काही मादक पदार्थ दिले आणि नंतर तिच्यावर बलात्कार केला. आरोपीने त्या महिलेचे फोटोही काढले होते. तक्रारीनंतर पोलिसांनी भोंदू बाबावर गुन्हा दाखल केला. आता ऋषिकेश वैद्य या आरोपीला पोलिसांनी ताब्यात घेतलं आहे.

# पुण्यात मद्य तस्करी टोळीचा पर्दाफाश



पुणे । प्रतिनिधी

गोव्यातील स्वस्त मद्य प्लास्टिक ड्रममध्ये भरून आणून महाराष्ट्रात नामांकित बँडच्या बाटल्यांमधून चढ्या दराने विक्री करणाऱ्या टोळीचा राज्य उत्पादन शुल्क पुणे विभागाने पर्दाफाश केला आहे. भरारी पथकाने या टोळीचा थरारक पाठलाग करून इंदापुरातून दोघांना जेरबंद केले आणि त्यांच्याकडून २० लाख ५३ हजारांचा मुद्देमाल जप्त केला आहे. दरम्यान सोलापूर आणि सातारा या जिल्ह्यांत छापे टाकून तस्करीची साखळीच उखडून टाकली आहे.

कांदलगाव (ता. इंदापूर) हद्दीत मद्यतस्करी होणार असल्याची माहिती उत्पादन शुल्क विभागाच्या भरारी पथकाला मिळाली होती. त्यानुसार २७ मार्च रोजी कांदलगाव ते शहा रस्त्यावर एका मालवाहू वाहनाला अडविण्यात आले. या वाहनाची झडती घेतली असता त्यात मद्याने भरलेले २५ प्लास्टिक ड्रम आणि रॉयल स्टॅग व्हिस्कीची १ हजार ४०० बनावट बूच मिळून आले.

या कारवाईत प्रेम सोमनाथ भडवलकर (रा. बारामती), अक्षय अधिकराव देशमुख (रा. सोलापूर) या दोघांना जागेवर अटक करण्यात आली. यानंतर आरोपी अक्षयच्या माढा येथील घरावर छापा टाकून सुमारे ४९ हजार रुपयांचा साठा आणि सातारा जिल्ह्यातील महिमानगड येथे फरारी आरोपीच्या घरावर छापा टाकून 'इम्पेरिअल ब्लू' व्हिस्कीच्या बाटल्या आणि बूच जप्त करण्यात आले. या कारवाईमुळे आंतरजिल्हा मद्यतस्करीची मोठी साखळी उखडून टाकण्यात एक्साइज विभागाला यश आले आहे. उत्पादन शुल्क विभागाचे आयुक्त डॉ. राजेश देशमुख, पुणे अधीक्षक अतुल कानडे यांच्या मार्गदर्शनाखाली निरीक्षक अशोक शितोळे, सत्यवान गोगावले, दुय्यम निरीक्षक सागर साबळे, प्रदीप झुंजरुक यांच्यासह पथकाने ही कारवाई केली.

# जमिनीचा ताब्या घेण्यावरुन महिलां-तरुणांमध्ये फ्री-स्टाईल हाणामारी, घटनेचे व्हिडिओ समोर

पुणे

पुणे जिल्ह्यातील खेड तालुका पुन्हा एकदा जमिनीच्या वादामुळे पेटला आहे. जमिनीचा ताबा घेण्यासाठी आलेल्या महिलांच्या टोळ्या आणि स्थानिक तरुणांमध्ये फ्री-स्टाईल हाणामारी झाल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. या संपूर्ण घटनेचे व्हिडिओ समोर आला आहे. यामध्ये महिलांची जोरदार हाणामारी झाल्याचे दिसत आहे. दरम्यान, या घटनेमुळं खेड तालुक्यात चांगलीच खळबळ उडाली आहे. मारहाण करण्यासाठी महिलांची बाहेरुन टोळी बोलावल्यामुळं या प्रकरणाची जोरदार चर्चा सुरु आहे.



खेड तालुक्यातील वाफगाव येथे जमिनीचा ताबा घेण्यासाठी बाहेरून महिलांची मोठी टोळी आणण्यात आली होती. मात्र स्थानिकांनी याला विरोध करताच वाद चिघळला आणि काही क्षणातच हा वाद थेट हाणामारीत परिवर्तित झाला. महिलांसह तरुणांमध्ये जोरदार ढकलाढकली, मारामारी आणि गोंधळ उडाल्याने परिसरात तणावपूर्ण परिस्थिती निर्माण झाली. या संपूर्ण घटनेचे व्हिडिओ समोर आले असून त्यात उघडपणे सुरु असलेली हाणामारी स्पष्ट दिसत आहे. अधिक धक्कादायक बाब म्हणजे पोलीस घटनास्थळी पोहोचूनही परिस्थिती नियंत्रणात आणण्यासाठी तात्काळ कठोर कारवाई झाल्याचे दिसून आले नाही, असा आरोप स्थानिकांनी केला आहे. जमिनीच्या ताब्यासाठी अशा प्रकारे महिलांचा वापर करून उघडपणे राडे घडवले जात असल्याने कायदा-सुव्यवस्थेचा प्रश्न गंभीर बनला असून सामान्य नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण पसरले आहे.

# प्रियकराचे क्रूर पाऊल! प्रेमसंबंध तोडल्याचा असा घेतला बदला; आरोपीला बेड्या

कात्रज

प्रेमसंबंध तोडल्याच्या रागातून एका तरुणीचा दोरीने गळा आवळून खून केल्याची धक्कादायक घटना मुंबई-बंगळुरू बाह्यवळण मार्गावरील नवीन कात्रज बोगदा परिसरात घडली आहे. यातील फरार आरोपीला आंबेगाव पोलिसांनी अटक केली आहे. मनीषा खम्म दमाई ( २५, रा. आयुषी कॉम्प्लेक्स, पारी कंपनी चौक, नऱ्हे) असे मृत तरुणीचे नाव आहे. प्रकाश अर्जुन तिखात्री ( ३०, सध्या रा. हिंजवडी, मूळ रा. ढकारी, जि. आछम, नेपाळ) असे अटक केलेल्या आरोपीचे नाव आहे.




या प्रकरणी किशन भरत परिहार ( ३५, रा. मानाजीनगर, नऱ्हे) यांनी आंबेगाव पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. मनीषा आणि आरोपीमध्ये प्रेमसंबंध होते. आरोपी कोणताही व्यवसाय, कामधंदा करत नसल्याने मनीषाने त्याच्याशी संबंध तोडले होते. यामुळे आरोपी तिच्यावर राग धरून होता. १८ मार्च रोजी आरोपीने मनीषाला नऱ्हे परिसरातून भेटण्याच्या बहाण्याने बोलावले. गोड बोलून तिला कात्रज बोगद्याजवळील एका हॉटेलच्या मागील दाट झाडीत नेले.

तेथे दोघांमध्ये वाद झाला आणि आरोपीने दोरीने गळा आवळून तिचा खून केला. त्यानंतर तो घटनास्थळावरून फरार झाला. दरम्यान, झाडीत एका तरुणीचा मृतदेह आढळून आल्यानंतर पोलिसांनी तपास सुरू केला. परिमंडळ दोनचे पोलीस उपायुक्त मिलिंद मोहिते व सहायक आयुक्त राहुल आवारे यांनी घटनास्थळी भेट दिली. तपासादरम्यान मृतदेहाची ओळख पटवून आरोपीला ताब्यात घेण्यात आले. चौकशीत आरोपीने गुन्ह्याची कबुली दिली असून पुढील तपास सहायक पोलीस निरीक्षक मुलाणी करत आहेत.

# पीएमपी बसमध्ये अल्पवयीन मुलीचा विनयभंग; कंडक्टरला बेड्या

पुणे । प्रतिनिधी

पीएमपीतून प्रवास करणाऱ्या युवतीशी अश्लील कृत्य करणाऱ्या वाहकाला सहकारनगर पोलिसांनी अटक केली. आरिफ जलील शेख ( ३५, रा. चौधरीनगर, विश्रांतवाडी) असे त्याचे नाव आहे. युवतीच्या आईने सहकारनगर पोलीस ठाण्यात दिलेल्या फिर्यादीनुसार, आरोपीविरुद्ध विनयभंग, तसेच बालकांचे लैंगिक अत्याचारांपासून संरक्षण अधिनियमान्वये (पोक्सो) गुन्हा दाखल केला आहे.



पीडित युवती अल्पवयीन आहे. ती २८ मार्च रोजी कात्रजहून स्वारगेटकडे जाणाऱ्या बसमधून प्रवास करत होती. आरोपी शेख हा पीएमपी वाहक (कंडक्टर) आहे. प्रवासादरम्यान त्याने युवतीला मोबाइल क्रमांक देण्याचा प्रयत्न केला. तिने नकार दिल्यानंतर स्पर्श करुन विनयभंग केला. युवतीने आरडाओरडा केला. प्रवाशांनी बस थांबविली. युवतीकडे विचारणा केल्यानंतर वाहकाने विनयभंग केल्याचा प्रकार उघडकीस आला. शेखला पकडून पोलिसांच्या ताब्यात देण्यात आले. सहायक पोलीस निरीक्षक जाधव तपास करत आहेत.

# पुण्यात वन विभागातील कर्मचाऱ्याला चार लाखांची लाच घेताना अटक

पुणे: जमिनीच्या सातबारा उताऱ्यावरील वनक्षेत्राचे शेरे काढून टाकण्यासाठी एकाकडून चार लाख रुपयांची लाच घेणाऱ्या वन विभागातील वनक्षेत्र सर्व्हेक्षकास (मोजणी कर्मचारी) लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने (एसीबी) रांगेहाथ पकडले. अरण्येश्वर परिसरात ही कारवाई केली. उदयसिंग भीमराव कुंभार (वय ४६, सध्या रा. कात्रज, मूळ रा. सातारा) असे लाचखोर कर्मचाऱ्याचे नाव आहे. याप्रकरणी कुंभारविरुद्ध सहकारनगर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे.




एसीबीच्या अधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीनुसार, तक्रारदार हे जमीन खरेदी-विक्री व्यवसाय करतात. वडगाव मावळ तालुक्यातील चिखलसेगाव, आपटी, कुणेनामा या गावात तक्रारदाराने जमीन खरेदी केली आहे. काही जमिनींच्या सातबारा उताऱ्यावर खासगी वनाचे शेरे लागले होते.

हे शेरे काढून टाकण्यासाठी त्यांनी महसूल विभागाकडून आदेश मिळवून त्याबाबतच्या नोंदी वन विभागाच्या कागदपत्रांवर घेण्यासाठी अर्ज दिला होता. याबाबतची प्रत मिळविण्याकरिता त्यांनी सेनापती बापट रस्त्यावरील उपवनसंरक्षक कार्यालयात अर्ज केला होता. या अर्जाच्या चौकशीसाठी ते वन विभागाच्या कार्यालयात गेले. हे काम वनक्षेत्र मोजणी कर्मचारी उदयसिंग कुंभार यांच्याकडे असल्याची माहिती त्यांना मिळाली.

कुंभार यांनी ११ आदेशांपैकी (रिस्टोर्ड ऑर्डर) ७ आदेशांच्या प्रती कार्यालयात आहेत. त्यासाठी सात लाख रुपयांची लाच कुंभार यांनी तक्रारदाराकडे मागितली. त्यानंतर तक्रारदाराने तडजोडीत चार लाख रुपये देण्याचे मान्य केले. रविवारी दुपारी साडेबारा वाजताच्या सुमारास एसीबीने सापळा लावला.

तक्रारदाराकडून चार लाख रुपयांची लाच घेताना कुंभार यांना पकडले. एसीबीचे पोलिस अधीक्षक शिरीष सरदेशपांडे, अतिरिक्त अधीक्षक अजित पाटील, अर्जुन भोसले यांच्या मार्गदर्शनात सहायक पोलिस आयुक्त सतीश वाळके आणि पथकाने ही कारवाई केली. पोलिस निरीक्षक प्रसाद लोणारे तपास करत आहेत.

# महाराष्ट्र साहित्य परिषदेच्या निवडणूक मतमोजणीत गैरप्रकार, परिवर्तन उत्कर्ष आघाडीचा आरोप, उच्च न्यायालयात रिट अर्ज दाखल

पुणे । प्रतिनिधी

महाराष्ट्र साहित्य परिषदेच्या (मसाप) पंचवार्षिक निवडणुकीत 'साहित्य संवर्धन आघाडी'ने बाजी मारत सत्तेत बदल घडवून आणला होता. योगेश सोमण अध्यक्षपदी निवडून आले होते. त्यांना ५ हजार ३६५ मते मिळाली होती. तर स्वाती महाळंक कार्यवाह, तर प्रदीप निफाडकर कोषाध्यक्षपदी विजयी झाले आहेत. अत्यंत चुरशीच्या लढतीत सोमण यांनी मिलिंद जोशी यांचा अवघ्या ४५ मतांनी पराभव केला होता. दरम्यान, महाराष्ट्र साहित्य परिषदेच्या झालेल्या पंचवार्षिक निवडणुकीत मतमोजणी करताना गैरप्रकार झाल्याचा आरोप परिवर्तन उत्कर्ष आघाडीनं केला आहे.



निवडणूक अधिकाऱ्यांनी केलेल्या गैरप्रकाराबाबत परिवर्तन उत्कर्ष आघाडीनं मुंबईच्या उच्च न्यायालयात रिट अर्ज दाखल करण्यात आला आहे. मतपेटी सील करताना झालेल्या एकूण मतदानाची आकडेवारी अथवा टक्केवारी जाहीर करणे अपेक्षित होते ती दिली गेली नसल्याची तक्रार केली आहे. मिलिंद जोशी आणि योगेश सोमण यांच्यात केवळ ४५ मतांचे अंतर आहे. तत्काळ फेरमतमोजणीची लेखी मागणी करूनही निवडणूक अधिकाऱ्यांनी ती नाकारली गेली असल्याची तक्रार दाखल केली आहे. निवडणूक अधिकाऱ्यांचे हे वर्तन संशयास्पद आहे असे परिवर्तन उत्कर्ष आघाडीच्या वतीने काढलेल्या पत्रकात म्हटले आहे. रिट अर्ज ताबडतोब सुनावणीस घेण्यात यावा म्हणून उच्च न्यायालयाच्या मुख्य न्यायाधीशांना लिखित विनंती केली आहे. महाराष्ट्र साहित्य परिषदेच्या अध्यक्षपदाच्या निवडणुकीत योगेश सोमण यांनी मिलींद जोशी यांचा पराभव केला होता. तर मुख्य कार्यवाह या महत्त्वाच्या पदांवर देखील स्वाती महाळंक आणि कोषाध्यक्ष पदावर प्रदिप निफाडकर हे साहित्य संवर्धन पॅनेलचे उमेदवार निवडून आले होते. परिवर्तन उत्कर्ष पॅनेलच्या मुख्य कार्यवाह पदाच्या उमेदवार सुनिताराजे पवार आणि कोषाध्यक्ष पदाचे उमेदवार विनोद कुलकर्णी यांचा पराभव झाला. परिवर्तन उत्कर्ष पॅनेलचे आशुतोष जावडेकर आणि अंजली कुलकर्णी, माधव राजगुरु हे उमेदवार निवडून आले होते. मात्र, साहित्य संवर्धन पॅनेलच्या उमेदवारांची संख्या जास्त आहे. पुढील वर्षी होणारं अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन १०० वं साहित्य संमेलन ठरणार आहे. १०० वं अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन पुण्यात होणार आहे. या संमेलनाच्या आयोजनाची जबाबदारी महाराष्ट्र साहित्य परिषदेकडे असणार आहे.

# ज्ञानेश्वर माऊलींच्या पालखीचे पुण्यातील मुक्कमाचे ठिकाण बदलणार? वर्षानुवर्षांची परपरा मोडीत निघणार!

पुणे । प्रतिनिधी

आषाढी वारीसाठी आळंदीहून प्रस्थान केल्यानंतर ज्ञानेश्वर महाराजांची पालखी दोन दिवस पुण्यातील पालखी विठोबा मंदिरात मुक्कामाला असते. मात्र वर्षानुवर्षांची परंपरा मोडीत काढून ज्ञानेश्वर महाराजांच्या पालखीच्या मुक्कमाचे ठिकाण बदलण्याचा प्रयत्न देवस्थानच्या विश्वस्तांकडून केला जातोय. मागीलवर्षी पालखी मंदिरात मुक्कामी असताना आळंदी देवस्थानचे एक विश्वस्त आणि पालखी विठोबा मंदिराचे विश्वस्त यांच्यामध्ये झालेल्या वादामुळे पालखीच्या मुक्कमाचे ठिकाण बदललं जात असल्याचं बोललं जातंय. मात्र आळंदी देवस्थानच्या विश्वस्तांकडून पालखी विठोबा मंदिर आणि परिसराची जागा गर्दीसाठी कमी पडत असल्याचं कारण दिलं आहे.




मागील आठवड्यात सादर करण्यात आलेल्या पुणे महापालिकेच्या अर्थसंकल्पात पालखी विठोबा मंदिराच्या परिसरातील जागा अधिग्रहित करून भाविकांसाठी मोठी जागा उपलब्ध करून देण्यासाठी दहा कोटींची तरतूद करण्यात आलीय. असं असताना देखील ज्ञानेश्वर महाराजांच्या पालखीची जागा बदलण्यास पालखी विठोबा मंदिरातील विश्वस्तांनी विरोध केलाय. मात्र आळंदी देवस्थानचे विश्वस्त सोमवारी याबाबत चर्चा करण्यासाठी पुण्याच्या जिल्हाधिकाऱ्यांची दुपारी तीन वाजता भेट घेणार आहेत. पुण्यातील एस पी कॉलेजच्या मैदानावर पालखीचा मुक्काम आयोजित करण्याची चाचपणी सुरू असल्याचं बोललं जात आहे. यंदाच्या आषाढी यात्रा नियोजनासाठी संत ज्ञानेश्वर महाराज पालखी सोहळा प्रमुख सर्व विश्वस्त आणि देवस्थानचे विश्वस्त यांच्यात झालेल्या बैठकीनुसार आठ जुलै रोजी दुपारी तीन वाजता संत ज्ञानेश्वर महाराजांच्या पालखी सोहळ्याचे प्रस्थान होणार असल्याचे सोहळा प्रमुख एडवोकेट राजेंद्र उमाप यांनी सांगितले. यावर्षी नेहमीपेक्षा एक तास लवकर म्हणजेच दुपारी तीन वाजता प्रस्थान सोहळा करण्याचा निर्णयही या बैठकीत घेण्यात आल्याचे उमाप यांनी सांगितले.

पालखी प्रस्थान पूर्वी दरवर्षी दशमीला पंढरपूर येथील संत ज्ञानेश्वर मंदिरात नियोजनाची बैठक होते. त्यानुसार झालेल्या बैठकीत माऊली पालखी सोहळ्याच्या सर्व तारखा आणि कार्यक्रम निश्चित करण्यात आले. पालखी सोहळ्यात होणारे गोल रिंगण उभे रिंगण याशिवाय इतर प्रमुख कार्यक्रमातील अडचणी बाबतही चर्चा झाल्या. यापूर्वी पालखी सोहळा प्रमुख विश्वस्थ प्रशासन यांनी एकत्रित स्थळ पाहणी केली होती त्यानुसार बैठकीत संपूर्ण पालखी सोहळ्याचे नियोजन करण्यात आल्याचे उमाप यांनी सांगितले आहे.

# पाटस साखर कारखान्यात बगॅसला भीषण आग

पाटस: पाटस (ता. दौंड) येथील भीमा पाटस सहकारी साखर कारखान्याच्या बगॅसला सोमवारी (दि. ३०) सकाळी सुमारे सव्वा दहाच्या दरम्यान अचानक आग लागल्याची घटना घडली. या भीषण आगीत बगॅस भरण्यासाठी उभा असलेला एक ट्रक पूर्णपणे जळून खाक झाला. दोन अग्निशामक गाड्या आग आटोक्यात आणण्यासाठी उपलब्ध झाल्या आहेत.



मिळालेल्या माहितीनुसार, कारखान्याच्या परिसरातील बगॅसला अचानक आग लागली. आगीचे कारण अद्याप स्पष्ट झाले नसले तरी काही क्षणांतच आगीने विक्राळ रूप धारण केले. यावेळी घटनास्थळी उभा असलेला ट्रक आगीच्या विळख्यात सापडला आणि पाहता पाहता पूर्ण जळून खाक झाला. कारखान्याच्या दक्षिण दिशेला बगॅसचा मोठा साठा जमा असतो. त्याच कारखान्याच्या संरक्षण भिंत बाहेरून मोटेवाडाकडील रोड, शेती व कारखाना शाळा आहे. ही आग लागल्याने त्या परिसरात नागरिकांची धावपळ उडाली होती. घटनेची माहिती मिळताच स्थानिक नागरिकांनी व संबंधित यंत्रणांनी तत्काळ धाव घेत आग आटोक्यात आणण्याचे प्रयत्न केले. सुदैवाने या घटनेत कोणतीही जीवितहानी झाली नाही; मात्र ट्रक पूर्णपणे जाळून खाक झाला व बगॅस ही खाक होत असल्याने मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. या आगीचे नेमके कारण काय, हे अजून समजले नाही याबाबत तपास सुरू आहे.